Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 12 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १२ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था- इस्रोनं  स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत अंतराळात प्रक्षेपित केलेले दोन्ही उपग्रह एकमेकांपासून १५मीटर अंतरावर दूर असून ते एकमेकांशी जोडण्यात येणार आहेत. इस्त्रोतर्फे या संदर्भातली माहिती देण्यात आली. लहान अंतराळयान वापरून त्यांना अंतराळात जोडणं हा या मोहिमेचा उद्देश आहे. या मोहिमेच्या यशस्वी प्रात्यक्षिकामुळं भारतीय अंतरिक्ष स्थानक  आणि चंद्रावर अंतराळवीर उतरवणं यासारख्या भविष्यातल्या मोहिमांसाठी महत्त्वाच्या असलेल्या जटिल तंत्रज्ञानात प्रभुत्व मिळवणारा भारत चौथा देश बनणार असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे.

****

इलेक्ट्रॉनिक कंपन्यांना आवश्यक चीप्स आणि सेमीकंडक्टर्स निर्मितीसाठी पुण्याजवळ रांजणगांव इथं सहा हजार कोटी रुपयांची तरतुद असणा-या  इलेक्ट्रानिक क्लस्टरची स्थापना होत असल्याचं केंद्रिय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं आहे. पुणे इथं काल प्रगत संगणन विकास केंद्र -सीडॅकला भेट दिली त्यावेळी ते बोलत होते. पुणे- नाशिक रेल्वेमार्गावर नारायणगावच्या जी.एम.आर.टी. या आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेवर २३  देश अवलंबून असल्यानं, कोणत्याही परिस्थितीत ही वेधशाळा अन्यत्र हलवणार नाही अशी माहितीही  वैष्णव यांनी दिली. तंत्रज्ञान सामान्यांर्यंत पोहोचवणं हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मुख्य उद्दिष्ट असून पन्नास टक्क्यांहून अधिक उपकरणं भारतीय बनावटीची असणारं राष्ट्रीय महासंगणकीय मिशनही प्रगती पथावर आहे अशी माहिती त्यांनी दिली.

****

वैष्णव यांनी काल पुण्यातील भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या सुसज्ज सभागृहाचं उद्घाटनही केलं.  दरम्यान, वर्ष २०४७ पर्यंत भारताला विकसित करण्यासाठी पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, उत्पादकता, कायद्यांची सुधारणा आणि सर्वसमावेशक विकास हे मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतील असं प्रतिपादन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी, काल पुण्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना केलं.

****

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तीन हजार युवा नेत्यांशी थोड्याच वेळात संवाद साधणार आहेत. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादनं आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकांचं प्रकाशन होत आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच  उपराष्ट्रपती जगदीप धनखड , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना आपल्या संदेशांमधून अभिवादन केलं आहे.

****

शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राष्ट्रमाता जिजाऊंच्या ४२७ व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बुलढाणा जिल्ह्यातल्या सिंदखेड राजा इथल्या राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्मस्थळी  सूर्योदयावेळी शासकीय महापूजा करण्यात आली.केंद्रीय आयुष आरोग्य आणि कुंटुब कल्याण राज्यमंत्री प्रताप जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही पुजा झाली. यावेळी राजे लखोजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव उपस्थित होते.

****

भारत–आयर्लंड महिला संघांदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत,आजचा दुस–या सामन्याला गुजरातच्या राजकोट इथं थोड्यावेळापूर्वीच सुरुवात झाली.नाणेफेक जिंकून भारतानं प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

भारतानं ,मालिकेत पहिला सामना जिंकत एक–शुन्य अशी आघाडी घेतली आहे.

****

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत आज पहिल्या दिवशी पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत भारताच्या सुमित नागलचा सामना चेक प्रजासत्ताकच्या खेळाडूशी होत आहे. यासह या स्पर्धेत ऋत्विक चौधरी बोल्लीपल्ली, रोहन बोपण्णा, युकी भांबरी आणि श्रीराम बालाजी हे खेळाडूदेखील भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं इंग्लंडविरुद्धच्या आगामी पाच टीट्वेंटी सामन्यांच्या मालिकेसाठी पंधरा सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली आहे. मालिकेतला पहिला सामना २२ जानेवारी रोजी कोलकाता इथं होणार आहे. सुर्यकुमार यादव संघाचं नेतृत्त्व करणार आहे तर अक्षर पटेल उपकर्णधार असेल. मोहम्मद शमी या मालिकेद्वारे एक वर्षानंतर संघामध्ये पुनरागमन करत आहे. या मालिकेनंतर इंग्लंड संघ तीन एक दिवसीय सामन्यांची मालिकाही खेळेल. या मालिकेकडे १९ फेब्रुवारी रोजी सुरू होणाऱ्या चँपीयन्स चषक स्पर्धेची पुर्व तयारी म्हणून पाहिलं जात आहे.

****

मराठवाडा आणि उत्तर कोकणातल्या काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. उत्तर मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस आणि गडगडाटी वादळ होईल. अन्यत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

****

नांदेड जिल्ह्यात सांडपाणी व्यवस्थापनासाठी नरेगा अंतर्गत प्रत्येक घरासाठी वैयक्तिक शोषखड्ड्यांची उभारणी करण्याचे निर्देश, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिले आहेत. त्या काल नांदेड इथं एका कार्यक्रमात बोलत होत्या.ग्रामपंचायतींनी स्थानिक लोकसहभागातून हे अभियान गतीने राबवण्याचं आवाहन यांनी केलं.

****